# मुंबई विद्यापीठ

<u>निवडणूक विभाग</u>

## <u>जाहीर प्रकटन</u>

क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/**२०१**.

**विषय :- विद्यापीठ विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणूकीसाठी मतदार याद्या तयार करण्याच्या दृष्टीने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेबाबत.**

विद्यापीठामध्ये विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू करण्यात येत आहे. विविध प्राधिकरणांच्या व मंडळाच्या निवडणूकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील खालील कलमानुसार संबंधीत प्राधिकरणांच्या मतदार यादीमध्ये नोंदणी करण्याकरीता अर्ज ऑनलाईन (Online) भरण्याचे सूचित करण्यात येत आहे.

१) कलम २८(२)(ण)/[28(2)(o)] अन्वये अधिसभेवर दहा (१०) प्राचार्य/संचालक,
२) कलम २८(२)(द)/[28(2)(r)] अन्वये अधिसभेवर महाविद्यालयीन/परिसंस्थांतील दहा (१०) अध्यापक ***व*** ३२(३)(छ)/[32(3)(g)] अन्वये विद्यापरिषदेवर महाविद्यालयीन/ परिसंस्थातील प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन (०२) अध्यापक
३) कलम २८(२)(ध)/[28(2)(s)] अन्वये अधिसभेवर तीन (०३) विद्यापीठ अध्यापक,
४) कलम २८(२)(त)/[28(2)(p)] अन्वये अधिसभेवर संलग्न महाविद्यालयीन/ परिसंस्थातील सहा (०६) व्यवस्थापनाचे प्रतिनिधी,
५) कलम ४०(२)(ग)/[40(2)(c)] अन्वये अभ्यासमंडळावर महाविद्यालयातील/ परिसंस्थातील तीन (०३) विभाग प्रमुख.

सर्व संबंधितांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६३, ६४ आणि ६५ चे अवलोकन करावे. संपूर्ण प्रक्रियेमध्ये उपरोक्त कलमाद्वारे विहीत केलेल्या निरर्हता तसेच तरतुदी लागू आहेत.

**<u>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २ मधील काही तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.</u>**

**<u>प्राचार्य/संचालक (Principal/Director)</u>**

**कलम** २(४४) : **''प्राचार्य''** याचा अर्थ, विद्यापीठाने प्राचार्य म्हणून यथोचितरीत्या मान्यता दिलेल्या अध्यापक, असा आहे.

**कलम** २(१७) : **''प्राचार्यांचा गट''** याचा अर्थ, जे पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थाचे संचालक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्यांनी व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण असा आहे.

....२/-

**अध्यापक (Teacher)**

**कलम** २(६१) : **"अध्यापक''** याचा अर्थ, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्राचा संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचा संचालक, विद्यापीठाचा उप किंवा सहायक ग्रंथपाल व महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे.

**कलम** २(१८) : **"अध्यापकांचा गट''** याचा अर्थ, जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

**विद्यापीठ अध्यापक (University Teacher)**

**कलम** २(६८) : **"विद्यापीठ अध्यापक''** याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेला पूर्णकालिक अध्यापक, असा आहे.

**कलम** २(१९) : **"विद्यापीठ अध्यापकांचा गट''** याचा अर्थ, जे विद्यापीठाने नियुक्त केलेले विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयांचे पूर्णकालिक अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, विद्यापीठ विभागांचे, विद्यापीठ परिसंस्थांचे आणि संचालित महाविद्यालयांचे पूर्णकालिक अध्यापक यांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

**व्यवस्थापन प्रतिनिधी (Representative of Management)**

**कलम** २(३७) : ''**व्यवस्थापन''** याचा अर्थ, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक महाविद्यालयांचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे किंवा उच्च शिक्षणाच्या इतर परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात येतात असे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमान्वये, नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त मंडळाचे किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेचे किंवा कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कंपनीचे विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ, -मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे.

**कलम** २(१६) : ''**व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट''** याचा अर्थ, जे संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या प्रतिनिधींचा मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

**विभागप्रमुख (Head of the Department)**

**कलम** २(३१) : **"विद्यापीठ विभागाचा प्रमुख''** ''परिसंस्थेचा प्रमुख'' आणि ''महाविद्यालय विभागाचा प्रमुख'' याचा अर्थ, परिनियमामध्ये विहित केल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यापीठ विभागाचा प्रमुख, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख आणि महाविद्यालय विभागाचा प्रमुख, असा आहे.

**कलम** २(१४) : **"संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा गट''** याचा अर्थ, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा, जे संबंधित प्राधिकरणांचे सदस्य म्हणून त्यांच्यामधून निवडून येतील, त्यांचा समावेश असलेला निर्वाचक गण, असा आहे.

....३/-

**<u>ऑनलाईन अर्ज करतांना संबंधित अर्जासोबत खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.</u>**

१) **<u>प्राचार्य/संचालक</u>** – प्राचार्य पदावरील नियुक्तीस विद्यापीठाने दिलेल्या सद्यस्थितीतील वैध असलेल्या मान्यता पत्राची (Approval Letter) स्व-सांक्षाकित प्रत.

२) **<u>महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक</u>** – पूर्ण वेळ अध्यापक पदावरील नियुक्तीस विद्यापीठाने दिलेल्या सद्यस्थितील वैध असलेल्या मान्यता पत्राची (Approval Letter) मतदार नोंदणीसमयी वैध असलेली स्व-सांक्षाकित प्रत.

३) **<u>मुंबई विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागात कार्यरत असलेले अध्यापक</u>** – विद्यापीठाने दिलेल्या पूर्ण वेळ अध्यापक पदावरील नेमणूक आदेशाची स्व-सांक्षाकित प्रत.

४) **संस्थेच्या व्यवस्थापन प्रतिनिधीचा मतदारासाठी नामनिर्देशन केलेल्या ठरावाची प्रत. (विहित नमुन्यातील)**

५) **<u>महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख</u>** – महाविद्यालय/परिसंस्थांतील विद्यापीठ मान्यताप्राप्त पूर्ण वेळ अध्यापक जो संबंधीत विषयाचा विभाग प्रमुख असेल तोच अभ्यासमंडळाच्या निवडणुकीसाठी पात्र असेल, तसेच परिनियमातील तरतुदीप्रमाणे एका विषयासाठी महाविद्यालयीन/परिसंस्थेतील विभागप्रमुख म्हणून नाव पाठविण्यास पात्र राहील. विभागप्रमुख म्हणून ऑनलाईन पध्दतीने नाव पाठविताना खालील कागदपत्रे अपलोड करावीत.

अ) संबंधित विषय महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये पूर्ण वेळ शिकवत असल्याबाबत विद्यापीठाने दिलेले शिक्षक मान्यता पत्र.

ब) विभाग प्रमुख म्हणून नेमणूकीचे प्राचार्यांचे/संचालकांचे स्व-सांक्षाकित प्रमाणपत्र. प्राचार्य/ संचालक हे विभागप्रमुख असल्यास संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे त्यासंबंधीचे स्व-सांक्षाकित प्रमाणपत्र.

क) संबंधित विषय महाविद्यालय/परिसंस्थेत शिकविण्यास महाराष्ट्र शासनाच्या मंजुरी पत्राची स्व-सांक्षाकित प्रत.

ड) संबंधित विषय महाविद्यालय/परिसंस्थेत शिकविण्यास विद्यापीठाच्या संलग्निकरण/मान्यता पत्राची स्व-सांक्षाकित प्रत.

६) **उपरोक्त सर्व प्राधिकरणांच्या निवडणूक मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नोंदणी करतांना आधार कार्ड, फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे.**

**<u>मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नोंदणी करताना खालील पध्दत अवलंबवावी:-</u>**

१. विद्यापीठाच्या http://mu.ac.in वरील **Election – 2022** किंवा http://mu.eduapp.co.in या link वर Click करावे.

२. मतदार म्हणून नोंदणी (Registration) करण्याकरीता निवडणूक २०२२ च्या मुख पृष्ठावरील Login/Registration या Tab वर Click करावे.

३. तद्नंतर आपणांस ज्या प्राधिकरणाच्या निवडणुकीच्या मतदार यादी मध्ये नोंदणी करावयाची आहे. तो संबंधीत पर्याय निवडावा. उदा. प्राचार्य/संचालक (Principal/Director), अध्यापक (Teacher), विद्यापीठ अध्यापक (University Teacher), व्यवस्थापन प्रतिनिधी (Representative of Management) आणि विभागप्रमुख (Head of the Department) etc.

४. उपरोक्त पर्याय निवडल्यानंतर आपणांस Login/Registration हा पर्याय उपलब्ध होईल. त्यामध्ये आपण Registration हा पर्याय निवडावा.

५. नोंदणी (Registration) च्या पर्यायामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

क) भ्रमणध्वनी क्रमांकाची (Mobile No.) नोंद करावी.

ख) Send OTP पर्यायावर Click करावे.

ग) OTP भ्रमणध्वनी वर प्राप्त झाल्यावर Enter OTP या पर्यायामध्ये तो नोंद करावा व Enter करावे.

घ) OTP न आल्यास पुन्हा Resend OTP या पर्यायावर Click करावे.

ङ) Password हा कमीतकमी आठ (८) अंकाचा असावा. हा Alpha & Numeric असावा.

च) OTP Verification झाल्यावर पुढील माहिती भरावी.

छ) सर्व माहिती भरून प्रविष्ट केल्यानंतर आपली नोंदणी (Registration) प्रक्रिया पूर्ण होईल व आपला User Id व पासवर्ड तयार होईल. तो आपल्या Email Id वर पाठविण्यात येईल.

६. User ID आणि Password चे नोंदणी (Registration) झाल्यानंतर Login या पर्यायामध्ये User Id प्रविष्ट करावा व Send OTP या Option पर्यायावर Click करावे. OTP Verification झाल्यावर password व इतर माहीती भरून Login करावे.
७. Voter Registration Form वरील सर्व माहिती अचुक भरावी.
८. संबधीत ठिकाणी कागदपत्रे, फोटो, सही upload करावीत (सदर कागदपत्रे अर्ज भरण्याआधी Soft Copy मध्ये उपलब्ध करून ठेवावी. फोटो, सही, आधार कार्ड हे JPG or PNG Format मध्ये असावे व इतर कागदपत्रे Pdf Format मध्ये असावीत.)
९. संपुर्ण Voter Registration अर्ज Preview मध्ये उपलब्ध होतो. तो आधी बघून आपण भरलेली माहिती अचूक आहे याची खात्री करावी. जर माहिती मध्ये काही दुरूस्ती हवी असल्यास Previous option वर click करून आपणांस हवी असलेली माहिती दुरूस्त करून घ्यावी.
१०. आपण भरलेली माहिती व कागदपत्रे हि बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर आपण submit option वर click करावे. submit option वर click केल्यानंतर आपणांस Voter Registration अर्जामधील कोणत्याही माहितीमध्ये बदल करता येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.
११. तद्नंतर अर्जाची Print out plain paper वर काढावी, व्यवस्थापन प्रतिनीधी यांच्या अर्जाची Print out संस्थेच्या Letter Head वर काढावी.
१२. Print out काढलेला अर्ज संबंधीत प्राधिकरणाकडून सही व शिक्कानिशी Certified करून घ्यावा.
१३. अर्जाचे Certification झाल्यानंतर अर्जाची Scan करून PDF File तयार करावी.
१४. सदर PDF File संबंधीतांनी आपल्या लॉगिनमधून Upload Certified Scan Application या Option वरून ती Upload करावी.
१५. उपरोक्त अर्जावर असलेल्या माहितीच्या सत्यतेबाबत संबंधीत अर्ज भरणारा व्यक्तीच/ मतदारच जबाबदार राहील व त्याने भरलेल्या चुकीच्या माहितीबाबत विद्यापीठाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही यांची संबंधीतांनी नोंद द्यावी.

**टिप :- १) सदर निवडणूक मतदार यादीमध्ये नोंदणी करण्याकरीता उपलब्ध असलेले Software Microsoft Edge (Latest Version), Google Crome (Latest Version), Mozilla (Latest Version) या Browsers मध्येच Open करावे.**
**२) Browsers मधील Popup सदर Software करीता Allow/Activate करावा.**

**अर्जामध्ये आपली माहिती वर नमुद केलेल्या पध्दतीनुसार शुक्रवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ ते सोमवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत,** विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://mu.ac.in (Election-2022) किंवा http://mu.eduapp.co.in येथे भरता येईल.

सदर अधिसूचनेच्या संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुरध्वनी क्रमांक ०२२ ६८३२००१२/१७ वर संपर्क साधावा.

सॉफ्टवेअर मधील Technical सहाय्यतेकरीता 91-7796171731, 91-796171768, 91-7796171729, 91-7796171746, 917796171770 वर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

विद्यापीठ विभागातील / महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील जे प्राचार्य / संचालक / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक मतदार नोंदणीच्या कालावधीपर्यंत मूळ पदावर कार्यरत असतील, परंतु संबंधीत निवडणूकीचे प्रकटन (निवडणूक सुचना) प्रसिध्दीच्या दिनांकास ते धारणाधिकार ठेऊन इतरत्र कार्यरत असतील अशा मतदारांना मतदान करता येणार नाही व निवडणूकही लढविता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नोंद होण्यासाठी विहीत ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर आलेले अर्ज, अपूर्ण अर्ज तसेच आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज नाकारले जातील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

या संदर्भातील निर्देश, प्रकटन, निवडणूक कार्यक्रम, निवडणूक सूचना, मतदार याद्या इ. बाबी फक्त विद्यापीठाच्या http://mu.ac.in (Election-2022) किंवा http://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील. सबब, विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील संबंधित माहिती सर्व संबंधितांनी वेळोवेळी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे. या संदर्भात इतर कोणताही पत्रव्यवहार, ई-मेलने उत्तर देणे इ. केले जाणार नाही, याची कृप्या सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(प्रा. शैलेंद्र देवळाणकर)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२२
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न/स्वायत्त महाविद्यालये.
२) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त/स्वायत्त संस्था.
३) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग.

यांना विनंती करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत करावे.

***************